# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, भिवंडी

**विषय :- भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या समाज कल्याण विभाग अंतर्गत दिव्यांग व्यक्तींकरीता सन २०२३-२४ मध्ये राबविण्यात येणा-या योजना, लाभार्थी संख्या व रक्कम निश्चित करण्यास मान्यता मिळणेबाबत.**

**संदर्भ :- १. नगर विकास विभागाकडील शासन निर्णय क्र. दिव्यांग २०१८/प्र.क्र.५२/१८/नवि-२८, दि. १० मे, २०१८**
**२. नगर विकास विभागाकडील शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१५/प्र.क्र.११८/नवि-२०, दि.२८ ऑक्टोबर, २०१५**

**प्रस्तावना**

महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पामध्ये दिव्यांग कल्याण योजना या शिर्षाखाली सन २०२३-२४ करिता रु. ४८.३४ लक्ष इतका निधी राखीव ठेवण्यात आलेला आहे. त्यानुसार उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या मुद्यांच्या अधिन राहून सन २०२३-२४ मध्ये भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या समाज कल्याण विभाग अंतर्गत दिव्यांग कल्याण या शिर्षाखाली राबविण्यात येणा-या योजना व करावयाच्या कामांचे नियोजन करण्यात आले असून ते खालीलप्रमाणे आहे.

**खालील १ ते १२ योजनांकरीता आवश्यक कागदपत्रे तसेच अटी व शर्ती**

१) कुटुंबाचे आर्थिक उत्पन्न रु.१,००,०००/- पर्यंत असलेबाबत तहसिलदार, भिवंडी यांचे कडील दाखला
२) अर्जदाराचे वय १८ पेक्षा जास्त असावे. (योजना क्रमांक ०१, ०८ व १२ वगळता)
३) दिव्यांग व्यक्ती शासकीय किंवा निमशासकीय सेवेत कार्यरत असल्यास त्यांना या योजनेचा लाभ घेता येणार नाही.
४) दिव्यांग व्यक्तींनी महानगरपालिका समाज कल्याण विभागात नोंदणी करणे आवश्यक आहे.
५) ४० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त दिव्यांगत्व असलेबाबत जिल्हा शल्य चिकीस्तक यांनी दिलेले दिव्यांग प्रमाणपत्र, तहसिलदार, भिवंडी यांचेकडील रहिवासी दाखला, मतदान ओळखपत्र/मतदार नोंदणी यादीची प्रत, शिधापत्रिका, बॅक पासबुक, घरपट्टी/पाणीपट्टी कर संपुर्ण कर भरलेबाबतच्या पावतीची छायांकित प्रत, भाड्याने राहत असल्यास भाडेकरार/भाडेपावती.
६) भिवंडी महानगरपालिका कार्यक्षेत्रातील पत्ताची नोंद दिव्यांग विद्यार्थी/दिव्यांग व्यक्ती यांचे आधारकार्डावर असणे आवश्यक आहे.

| अ.क्र | योजना | लाभाचे स्वरुप | लाभार्थी संख्या | आवश्यक निधी |
|---|---|---|---|---|
| १ | दिव्यांग विद्यार्थ्यांना शालेय शिक्षण / उच्च शिक्षण तसेच दिव्यांग खेळाडुंकरीता (जिल्हास्तर/राज्यस्तर/आंतरराष्ट्रीयस्तर) शिष्यवृत्ती देणे. | **विद्यार्थ्यांचे शिक्षण स्तर**<br>इयत्ता १ ली ते १० वी-रु. ५,०००/- प्रती वर्ष<br>इयत्ता ११ वी ते १५ वी- रु. ८,०००/- प्रती वर्ष | १०<br>५ | रु.९०,०००/- |
| | | **खेळाडूंकरिता स्पर्धेचे स्तर**<br>जिल्हास्तर/राज्यस्तर/राष्ट्रीयस्तर/ आंतरराष्ट्रीयस्तर- १०,०००/- प्रती वर्ष | ४ | रु.४०,०००/- |
| | सदर योजनेकरीता तक्ताच्या वर नमूद केलेले १ ते ६ व्यतीरिक्त ईतर आवश्यक कागदपत्र तसेच अटी व शर्ती<br>७) मुख्याध्यापक किंवा प्राचार्य यांचे शाळा/महाविद्यालयात शिक्षण घेत असलेबावतचे प्रमाणपत्र ८) खेळाडुंनी उपरोक्त अटींसोबत खेळामध्ये प्रवेश घेतल्याबाबत/निवड झाल्याबाबतचे सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र सादर करावे. ९) विद्यार्थ्याचे वय १८ वर्षापेक्षा कमी असल्यास त्यांच्या आईच्या बॅक खात्यात सदरची रक्कम जमा करण्यात येईल. | | | |
| २ | दिव्यांगाना उत्पनाच्या अटींवर घरासाठी/घर दुरुस्ती करणेकामी अर्थसहाय्य देणे | प्रती लाभार्थी रक्कम रु.५०,०००/- | ०१ | रु.५०,०००/- |
| | सदर योजनेकरीता तक्ताच्या वर नमूद केलेले १ ते ६ व्यतीरिक्त ईतर आवश्यक कागदपत्र तसेच अटी व शर्ती<br>७) दिव्यांग व्यक्तीं नविन घर बांधणार असल्यास यापूर्वी स्वत:चे घर नसलेबाबतचे प्रतिज्ञापत्रक सादर करावे.८) स्वत:च्या जागेत घर बांधणार असल्यास दिव्यांग व्यक्तींच्या किंवा घरातील कुटुंबातील नात्यातील व्यक्तीच्या नावे सातबारा/जागेशी संबंधीत पुरावे, ना हरकत दाखला, बांधकामाचे दरपत्रक (कोटेशन). ९) घर दुरुस्ती किंवा नविन घर बांधणार असल्यास महानगरपालिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. | | | |
| ३ | दिव्यांगाना व्यवसाय करण्याकरीता अर्थसहाय्य देणे | प्रती लाभार्थी रक्कम रु.५०,०००/- | १० | ५,००,०००/- |
| | सदर योजनेकरीता तक्ताच्या वर नमूद केलेले १ ते ६ व्यतीरिक्त ईतर आवश्यक कागदपत्र तसेच अटी व शर्ती<br>७) व्यवसाय करणेकामी साहित्य खरेदीबाबतचे दरपत्रक ८) व्यवसायाच्या जागेची कर पावती, भाड्याने असल्यास जागा मालकाचे नाहरकत प्रमाणपत्र व भाडेकरार, भाडेपावती सादर करावी. ९) आवश्यक परवाना पत्रे/शॉप ॲक्ट लायसन्स (गुमास्ता/उधोग आधार) सादर करावा. १०) अर्जदार बेरोजगार असलेबाबतचे प्रतिज्ञापत्रक. ११) मनपाने ज्या दिव्यांग व्यक्तींना व्यवसायासाठी कॅबीन उपलब्ध करून दिलेले आहेत त्यांना या योजनेचा लाभ घेता येणार नाही. १२) यापूर्वी सदर योजनेचा लाभ घेतलेल्या दिव्यांग व्यक्तींना या योजनेचा लाभ घेता येणार नाही. | | | |
| ४ | दिव्यांगाच्या वैद्यकीय खर्चाकरीता अर्थसहाय्य देणे | प्रती लाभार्थी रक्कम रु.२५,०००/- | ०२ | रु.५०,०००/- |

| अ.क्र. | योजना | लाभाचे स्वरुप | लाभार्थी संख्या | आवश्यक निधी |
|---|---|---|---|---|
| | सदर योजनेकरीता तक्ताच्या वर नमूद केलेले १ ते ६ व्यतीरिक्त ईतर आवश्यक कागदपत्र तसेच अटी व शर्ती ७) शासकीय रुग्णालयात सेवा उपलब्ध नसल्यास शासकीय वैद्यकिय अधिका-यांनी खाजगी रुग्णालयात पाठविलेबाबतचे पत्र. ८) वैद्यकिय खर्चाची मुळ देयके सादर करणे. ९) यापूर्वी सदर योजनेचा लाभ घेतला असल्यास या योजनेचा लाभ घेता येणार नाही. | | | |
| ५ | दिव्यांगांच्या बचत गटाना अर्थसहाय्य देणे | प्रती लाभार्थी रक्कम रु. ६०,०००/- | २ | रु.१,२०,०००/- |
| | सदर योजनेकरीता तक्ताच्या वर नमूद केलेले १ ते ६ व्यतीरिक्त ईतर आवश्यक कागदपत्र तसेच अटी व शर्ती ७) बचतगट स्थापने बाबतची ठरावाची प्रमाणित प्रत. ८) बचत गटाने नोंदणी प्रमाणपत्र जोडणे. ९) बचत गटातील सर्व सभासदांनी फोटो व स्वाक्षरीची यादी जोडावी. १०) यापूर्वी सदर योजनेचा लाभ घेतलेल्या दिव्यांग बचत गटांना या योजनेचा लाभ घेता येणार नाही. | | | |
| ६ | दिव्यांगांच्या लग्नासाठी अर्थसहाय्य करणे | प्रती लाभार्थी रक्कम रु.५०,०००/- | १ | रु.५०,०००/- |
| | सदर योजनेकरीता तक्ताच्या वर नमूद केलेले १ ते ६ व्यतीरिक्त ईतर आवश्यक कागदपत्र तसेच अटी व शर्ती ७) दिव्यांग व्यक्तींचे विवाह शासकीय विवाह नोंदणी कार्यालयाकडे नोंदविलेबाबतचे प्रमाणपत्र सादर करावे. ८) विवाहानंतर नावात बदल केल्याबाबतचे गॅझेट सादर करावे. ९) विवाह झाल्यानंतर किमान ०२ वर्षाच्या आत योजनेचा लाभ देण्यात येईल. १०) विवाहित वधू व वराचा प्रथम विवाह असावा, अशा प्रकारची मदत यापुर्वी घेतलेली नसावी. ११) वधु वरांचा एकत्रित लग्नाचा फोटो. | | | |
| ७ | १८ वर्षावरिल दिव्यांगांना उदरनिर्वाह करीता अनुदान देणे. | प्रती लाभार्थी रक्कम रु.२०,०००/- | ५५ | रु.११,००,०००/- |
| | सदर योजनेकरीता तक्ताच्या वर नमूद केलेले १ ते ६ व्यतीरिक्त ईतर आवश्यक कागदपत्र तसेच अटी व शर्ती ७) मनपाने ज्या दिव्यांग व्यक्तींना व्यवसायासाठी कॅबीन उपलब्ध करून दिलेले आहेत त्यांना या योजनेचा लाभ घेता येणार नाही. ८) प्रत्येक वर्षी स्वतंत्र अर्ज सादर करणे आवश्यक आहे. ९) ज्या दिव्यांग व्यक्तींनी यापूर्वी व्यवसाय करणेकामी रु. ५०,०००/- अनुदानाचा लाभ घेतला आहे अश्या दिव्यांग व्यक्तींना या योजनेचा लाभ घेता येणार नाही. १०) दिव्यांग व्यक्तींस सदर योजनेचा लाभ आर्थिक वर्षात माहे एप्रिल ते माहे मार्चपर्यंतचा देण्यात येईल. | | | |
| ८ | १० वर्ष ते १८ वर्षा खालील दिव्यांगांना उदरनिर्वाह करीता अनुदान देणे. | प्रती लाभार्थी रक्कम रु. ५,०००/- | २० | रु. १,००,०००/- |
| | सदर योजनेकरीता तक्ताच्या वर नमूद केलेले १ ते ६ व्यतीरिक्त ईतर आवश्यक कागदपत्र तसेच अटी व शर्ती ७) १० वर्ष ते १८ वर्षा खालील दिव्यांग व्यक्तींना या योजनेचा लाभ घेता येईल. ८) प्रत्येक वर्षी स्वतंत्र अर्ज सादर करणे आवश्यक आहे. ९) दिव्यांग व्यक्तींस सदर योजनेचा लाभ आर्थिक वर्षात माहे एप्रिल ते माहे मार्चपर्यंतचा देण्यात येईल. | | | |
| ९ | ६० वर्षावरिल दिव्यांगांना उदरनिर्वाह करीता अनुदान देणे. | प्रती लाभार्थी रक्कम रु.२०,०००/- | १० | रु.२,००,०००/ |
| | सदर योजनेकरीता तक्ताच्या वर नमूद केलेले १ ते ६ व्यतीरिक्त ईतर आवश्यक कागदपत्र तसेच अटी व शर्ती ७) मनपाने ज्या दिव्यांग व्यक्तींना व्यवसायासाठी कॅबीन उपलब्ध करून दिलेले आहेत त्यांना या योजनेचा लाभ घेता येणार नाही. ८) प्रत्येक वर्षी स्वतंत्र अर्ज सादर करणे आवश्यक आहे. ९) सदर योजनेचा लाभ ज्या दिव्यांग व्यक्तींचे वय ६० वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त असेल अश्या दिव्यांग व्यक्तींना या योजनेचा लाभ घेता येईल. १०) ज्या दिव्यांग व्यक्तींनी यापूर्वी व्यवसाय करणेकामी रु. ५०,०००/- अनुदानाचा लाभ घेतला आहे अश्या दिव्यांग व्यक्तींना या योजनेचा लाभ घेता येणार नाही. ११) दिव्यांग व्यक्तींस सदर योजनेचा लाभ आर्थिक वर्षात माहे एप्रिल ते माहे मार्चपर्यंतचा देण्यात येईल | | | |
| १० | कुष्ठरुग्णांना अनुदान देणे | प्रती लाभार्थी रक्कम रु. २०,०००/- | ०५ | रु.१,००,०००/- |
| | सदर योजनेकरीता तक्ताच्या वर नमूद केलेले १ ते ६ व्यतीरिक्त ईतर आवश्यक कागदपत्र तसेच अटी व शर्ती ७) कुष्टपिडीत व्यक्तींना सदर योजनेचा लाभ आर्थिक वर्षात माहे एप्रिल ते माहे मार्चपर्यंतचा देण्यात येईल. ८) प्रत्येक वर्षी स्वतंत्र अर्ज सादर करणे आवश्यक आहे. ९) ज्या कुष्ठरुग्ण व्यक्तींनी यापूर्वी व्यवसाय करणेकामी रु. ५०,०००/- अनुदानाचा लाभ घेतला आहे अश्या कुष्टरुग्ण व्यक्तींना या योजनेचा लाभ घेता येणार नाही. १०) कुष्ठपिडीत कारणास्तव किमान ४० टक्के व त्यापेक्षा जास्त कार्यात्मक/क्रियात्मक (Functional) असलेबाबत जिल्हा शल्य चिकीत्सक यांचे रुग्णालयाकडील प्रमाणपत्र. | | | |
| ११ | दिव्यांग विद्यार्थ्यासाठी आवश्यक शैक्षणीक साहीत्य /सहाय्यक उपकरणे खरेदीकामी अनुदान | प्रती लाभार्थी रु.२५,०००/- | ०६ | रु.१,५०,०००/- |
| | सदर योजनेकरीता तक्ताच्या वर नमूद केलेले १ ते ६ व्यतीरिक्त ईतर आवश्यक कागदपत्र तसेच अटी व शर्ती ७) यापूर्वी या योजनेचा लाभ घेतला असलेल्या दिव्यांग विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ पुन्हा घेता येणार नाही ८) मुख्याध्यापक किंवा प्राचार्य यांचे शाळा/महाविद्यालयात शिक्षण घेत असलेबाबतचे प्रमाणपत्र. ९)ज्या साहित्याची आवश्यकता आहे त्या साहित्याचे दरपत्रक/कोटेशन. | | | |
| १२ | दिव्यांग व्यक्तींस सहाय्यक उपकरणे खरेदी करणेकामी अनुदान देणे. | प्रती लाभार्थी रु.२५,०००/- | ०२ | रु.५०,०००/- |
| | | | एकूण | **रु. २६,००,०००/-** |
| | सदर योजनेकरीता तक्ताच्या वर नमूद केलेले १ ते ६ व्यतीरिक्त ईतर आवश्यक कागदपत्र तसेच अटी व शर्ती ७) यापूर्वी या योजनेचा लाभ घेतला असलेल्या दिव्यांग व्यक्तींना या योजनेचा लाभ पुन्हा घेता येणार नाही ८) ज्या साहित्याची आवश्यकता आहे त्या साहित्याचे दरपत्रक/कोटेशन. | | | |

भिवंडी महानगरपालिका कार्यक्षेत्रातील दिव्यांग व्यक्तींकरीता सामुदायीकरित्या राबविण्यात येणा-या योजना व करावयाची कामे

| अ.क्र. | करावयाची कामे | लाभाचे स्वरुप | लाभार्थी संख्या | आवश्यक निधी |
|---|---|---|---|---|
| १ | महानगरपालिका शाळेत शिक्षण घेत असलेल्या दिव्यांग विद्यार्थ्यांकरीता थेरपी सेंटर निर्माण करुन त्याठिकाणी थेरपी साहित्य उपलब्ध करून देणे. **(सन २०२२-२३ मधील प्रस्तावीत काम)** | रु. ६,००,०००/- | **सामुदायीकरित्या** | रु.६,००,०००/- |
| २ | महानगरपालिका सार्वजनिक वाचनालयामध्ये दिव्यांग व्यक्तींकरीता ऑडिओ लायब्ररी निर्माण करणे **(सन २०२२-२३ मधील प्रस्तावीत काम)** | रु. १,०५,०००/- | **सामुदायीकरित्या** | रु. १,०५,०००/- |
| २ | दिव्यांग व्यक्तींकरीता टॉयलेटची व्यवस्था करणे | रु. ५,००,०००/- | **सामुदायीकरित्या** | रु.५,००,०००/- |
| ३ | महानगरपालिका कार्यालयात दिव्यांग दृष्टीहीन व्यक्तींसाठी Stainless Steel Braille Signage ची व्यवस्था करणेबाबत. | रु. २,००,०००/- | **सामुदायीकरित्या** | रु. २,००,०००/- |
| ४ | महानगरपालिका कार्यालयात दिव्यांग व्यक्तींसाठी चालण्यासाठी PU TACTILE TILE DIRECTIONAL व TACTILE TILE WARNING ची व्यवस्था करणेबाबत. | रु. २,००,०००/- | **सामुदायीकरित्या** | रु. २,००,०००/- |
| ५ | दिव्यांगाच्या विविध स्पर्धा आयोजित करणे | रु. १,००,०००/- | **सामुदायीकरित्या** | रु.१,००,०००/- |
| ६ | **दिव्यांगांच्या कल्याणार्थ राबविण्यात येणा-या योजनांचा प्रचार/प्रसार करणे.** दिव्यांग कल्याणार्थ राबविण्यात येणा-या योजनांचा प्रचार/प्रसार करणे/दिव्यांग नोंदणी अर्ज /दिव्यांग योजना अर्ज स्विकारणे इत्यादीकामी पोर्टलची व्यवस्था करणे. | रु.५,००,०००/- | **सामुदायीकरित्या** | रु. ५,००,०००/- |
| ७ | उपरोक्त व्यतिरिक्त तिथल्या स्थानिक परिस्थितीनुसार आवश्यक असलेल्या महात्वाकांशी योजना अमंलात आणणे | | | २९,०००/- |
| | **एकूण रक्कम** | | | **रु.२२,३४०००/-** |
| | **एकूण रक्कम** | | | **रु.४८,३४,०००/-** |

उपरोक्त योजनेकरिता प्रथम येणा-या अर्जदारास प्रथम प्राध्यान्य या तत्वावर मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांच्या मान्यतेने लाभ देण्यात येतील. एका दिव्यांग व्यक्तींस वरीलपैकी एकाच आर्थिक लाभाच्या योजनेचा लाभ घेता येईल. प्राप्त होणारे अर्ज स्विकारणे अथवा नाकारण्याचे आधिकार मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांना राहतील. तसेच या योजनांकरिता प्रत्येक वर्षी दिव्यांग कल्याण करिता राखीव असलेली अर्थसंकल्पीय तरतूद विचारात घेऊन लाभार्थी संख्या व लाभाचे स्वरुप निश्चित करण्यात येईल.

तरी महानगरपालिका अर्थसंकल्पामध्ये दिव्यांग कल्याण विभागाकरिता राखीव असलेल्या निधीतून वरिलप्रमाणे योजना व कामे करणेकामी प्रस्ताव मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांच्या मंजुरीस्तव प्रस्तावित करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक :-** २०७ **दिनांक :** २१/०६/२०२३

केंद्र शासनाच्या धोरणाप्रमाणे दिव्यांग व्यक्तींच्या कल्याणासाठी दिव्यांग व्यक्तींसाठी समान संधी, संरक्षण व समान सहभाग कायदा १९९५, दि.०१/०१/१९९६ पासून लागू केलेला असून दिव्यांग व्यक्तींसाठी राखीव ठेवण्यांत आलेल्या ५ टक्के निधी नागरी भागातील दिव्यांगांसाठी खर्च करण्यांकरीता शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१५/प्र.क्र.११८/वि-२०, दि.२८/१०/२०१५ रोजीच्या मार्गदर्शक सूचना दिलेल्या असून, सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांनी दिव्यांगासाठी दिलेल्या निर्देशानुसार महानगरपालिका/नगरपालिकांमध्ये दिव्यांगांसाठी किमान ५ टक्के निधी राखीव ठेवणे व खर्च करणेबाबत स्पष्ट निर्देश आहेत व दिलेल्या प्रयोजनार्थ हा निधी खर्च करावयाचा आहे. त्याअनुषंगाने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या समाज कल्याण विभाग अंतर्गत दिव्यांग व्यक्तींकरीता सन २०२३-२४ मधील अर्थसंकल्पातील तरतूदीनुसार ५ टक्के निधीमधून खालील प्रमाणे नमूद केलेल्या राबविण्यात येणा-या योजना, लाभार्थी संख्या व रक्कम निश्चित करून व त्यास प्रशासनाची मान्यता मिळणेबाबत सादर केलेल्या प्रस्तावानुसार नमुद तक्त्यातील अ.क्र. १ ते १२ वैयक्तीक योजना व १ ते ७ सामुदायीक योजना राबविणे आवश्यक आहे. सदर योजनांसंदर्भात प्रथम येणा-या अर्जदारास प्रथम प्राध्यान्य या तत्वावर लाभ देण्यात येतील. त्याकामी लागणारा निधी व स्वरुप खालील तक्त्यांत नमुद केल्यानुसार पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | योजना | लाभाचे स्वरुप | लाभार्थी संख्या | आवश्यक निधी |
|---|---|---|---|---|
| १ | दिव्यांग विद्यार्थ्यांना शालेय शिक्षण / उच्च शिक्षण तसेच दिव्यांग खेळाडुंकरीता (जिल्हास्तर/राज्यस्तर/आंतरराष्ट्रीयस्तर) शिष्यवृती देणे. | **विद्यार्थ्यांचे शिक्षण स्तर**<br>इयत्ता १ ली ते १० वी-रु. ५,०००/- प्रती वर्ष<br>इयत्ता ११ वी ते १५ वी- रु. ८,०००/- प्रती वर्ष | १०<br>५ | रु.९०,०००/- |
| | | **खेळाडूंकरिता स्पर्धेचे स्तर**<br>जिल्हास्तर/राज्यस्तर/राष्ट्रीयस्तर/ आंतरराष्ट्रीयस्तर- १०,०००/- प्रती वर्ष | ४ | रु.४०,०००/- |
| | सदर योजनेकरीता तक्त्याच्या वर नमूद केलेले १ ते ६ व्यतीरिक्त ईतर आवश्यक कागदपत्र तसेच अटी व शर्ती ७) मुख्याध्यापक किंवा प्राचार्य यांचे शाळा/महाविद्यालयात शिक्षण घेत असलेबाबतचे प्रमाणपत्र ८) खेळाडुंनी उपरोक्त अटींसोबत खेळामध्ये प्रवेश घेतल्याबाबत/निवड झाल्याबाबतचे सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र सादर करावे. ९) विद्यार्थ्यांचे वय १८ वर्षापेक्षा कमी असल्यास त्यांच्या आईच्या बॅक खात्यात सदरची रक्कम जमा करण्यात येईल. | | | |
| २ | दिव्यांगाना उत्पनाच्या अटींवर घरासाठी/घर दुरुस्ती करणेकामी अर्थसहाय्य देणे | प्रती लाभार्थी रक्कम रु.५०,०००/- | ०१ | रु.५०,०००/- |
| | सदर योजनेकरीता तक्त्याच्या वर नमूद केलेले १ ते ६ व्यतीरिक्त ईतर आवश्यक कागदपत्र तसेच अटी व शर्ती ७) दिव्यांग व्यक्तीं नविन घर बांधणार असल्यास यापूर्वी स्वत:चे घर नसलेबाबतचे प्रतिज्ञापत्रक सादर करावे.८) स्वत:च्या जागेत घर बांधणार असल्यास दिव्यांग व्यक्तींच्या किंवा घरातील कुटुंबातील नात्यातील व्यक्तीच्या नावे सातबारा/जागेशी संबंधीत पुरावे, ना हरकत दाखला, बांधकामाचे दरपत्रक (कोटेशन). ९) घर दुरुस्ती किंवा नविन घर बांधणार असल्यास महानगरपालिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. | | | |
| ३ | दिव्यांगाना व्यवसाय करण्याकरीता अर्थसहाय्य देणे | प्रती लाभार्थी रक्कम रु.५०,०००/- | १० | ५,००,०००/- |
| | सदर योजनेकरीता तक्त्याच्या वर नमूद केलेले १ ते ६ व्यतीरिक्त ईतर आवश्यक कागदपत्र तसेच अटी व शर्ती ७) व्यवसाय करणेकामी साहित्य खरेदीबाबतचे दरपत्रक ८) व्यवसायाच्या जागेची कर पावती, भाड्याने असल्यास जागा मालकाचे नाहरकत प्रमाणपत्र व भाडेकरार, भाडेपावती सादर करावी. ९) आवश्यक परवाना पत्रे/शॉप अॅक्ट लायसन्स (गुमास्ता/उधोग आधार) सादर करावा. १०) अर्जदार बेरोजगार असलेबाबतचे प्रतिज्ञापत्रक. ११) मनपाने ज्या दिव्यांग व्यक्तींना व्यवसायासाठी कॅबीन उपलब्ध करून दिलेले आहेत त्यांना या योजनेचा लाभ घेता येणार नाही. १२) यापूर्वी सदर योजनेचा लाभ घेतलेल्या दिव्यांग व्यक्तींना या योजनेचा लाभ घेता येणार नाही. | | | |
| ४ | दिव्यांगाच्या वैद्यकीय खर्चाकरीता अर्थसहाय्य देणे | प्रती लाभार्थी रक्कम रु.२५,०००/- | ०२ | रु.५०,०००/- |
| | सदर योजनेकरीता तक्त्याच्या वर नमूद केलेले १ ते ६ व्यतीरिक्त ईतर आवश्यक कागदपत्र तसेच अटी व शर्ती ७) शासकीय रुग्णालयात सेवा उपलब्ध नसल्यास शासकीय वैद्यकिय अधिका-यांनी खाजगी रुग्णालयात पाठविलेबाबतचे पत्र. ८) वैद्यकिय खर्चाची मुळ देयके सादर करणे. ९) यापूर्वी सदर योजनेचा लाभ घेतला असल्यास या योजनेचा लाभ घेता येणार नाही. | | | |
| ५ | दिव्यांगांच्या बचत गटाना अर्थसहाय्य देणे | प्रती लाभार्थी रक्कम रु. ६०,०००/- | २ | रु.१,२०,०००/- |
| | सदर योजनेकरीता तक्त्याच्या वर नमूद केलेले १ ते ६ व्यतीरिक्त ईतर आवश्यक कागदपत्र तसेच अटी व शर्ती ७) बचतगट स्थापने बाबतची ठरावाची प्रमाणित प्रत. ८) बचत गटाने नोंदणी प्रमाणपत्र जोडणे. ९) बचत गटातील सर्व सभासदांनी फोटो व स्वाक्षरीची यादी जोडावी. १०) यापूर्वी सदर योजनेचा लाभ घेतलेल्या दिव्यांग बचत गटांना या योजनेचा लाभ घेता येणार नाही. | | | |
| ६ | दिव्यांगांच्या लग्नासाठी अर्थसहाय्य करणे | प्रती लाभार्थी रक्कम रु.५०,०००/- | १ | रु.५०,०००/- |
| | सदर योजनेकरीता तक्त्याच्या वर नमूद केलेले १ ते ६ व्यतीरिक्त ईतर आवश्यक कागदपत्र तसेच अटी व शर्ती ७) दिव्यांग व्यक्तींचे विवाह शासकीय विवाह नोंदणी कार्यालयाकडे नोंदविलेबाबतचे प्रमाणपत्र सादर करावे. ८) विवाहानंतर नावात बदल केल्याबाबतचे गॅझेट सादर करावे. ९) विवाह झाल्यानंतर किमान ०२ वर्षाच्या आत योजनेचा लाभ देण्यात येईल. १०) विवाहित वधू व वराचा प्रथम विवाह असावा, अशा प्रकारची मदत यापुर्वी घेतलेली नसावी. ११) वधु वरांचा एकत्रित लग्नाचा फोटो. | | | |
| ७ | १८ वर्षावरिल दिव्यांगांना उदरनिर्वाह करीता अनुदान देणे. | प्रती लाभार्थी रक्कम रु.२०,०००/- | ५५ | रु.११,००,०००/- |
| | सदर योजनेकरीता तक्त्याच्या वर नमूद केलेले १ ते ६ व्यतीरिक्त ईतर आवश्यक कागदपत्र तसेच अटी व शर्ती ७) मनपाने ज्या दिव्यांग व्यक्तींना व्यवसायासाठी कॅबीन उपलब्ध करून दिलेले आहेत त्यांना या योजनेचा लाभ घेता येणार नाही. ८) प्रत्येक वर्षी स्वतंत्र अर्ज सादर करणे आवश्यक आहे. ९) ज्या दिव्यांग व्यक्तींनी यापूर्वी व्यवसाय करणेकामी रु. ५०,०००/- अनुदानाचा लाभ घेतला आहे अश्या दिव्यांग व्यक्तींना या योजनेचा लाभ घेता येणार नाही. १०) दिव्यांग व्यक्तींस सदर योजनेचा लाभ आर्थिक वर्षात माहे एप्रिल ते माहे मार्चपर्यंतचा देण्यात येईल. | | | |
| ८ | १० वर्ष ते १८ वर्षा खालील दिव्यांगांना उदरनिर्वाह करीता अनुदान देणे. | प्रती लाभार्थी रक्कम रु. ५,०००/- | २० | रु. १,००,०००/- |
| | सदर योजनेकरीता तक्त्याच्या वर नमूद केलेले १ ते ६ व्यतीरिक्त ईतर आवश्यक कागदपत्र तसेच अटी व शर्ती ७) १० वर्ष ते १८ वर्षा खालील दिव्यांग व्यक्तींना या योजनेचा लाभ घेता येईल. ८) प्रत्येक वर्षी स्वतंत्र अर्ज सादर करणे आवश्यक आहे. ९) दिव्यांग व्यक्तींस सदर योजनेचा लाभ आर्थिक वर्षात माहे एप्रिल ते माहे मार्चपर्यंतचा देण्यात येईल. | | | |

| अ.क्र | योजना | लाभाचे स्वरुप | लाभार्थी संख्या | आवश्यक निधी |
|---|---|---|---|---|
| ९ | ६० वर्षावरिल दिव्यांगांना उदरनिर्वाह करीता अनुदान देणे. | प्रती लाभार्थी रक्कम रु.२०,०००/- | १० | रु.२,००,०००/ |
| | सदर योजनेकरीता तक्ताच्या वर नमूद केलेले १ ते ६ व्यतीरिक्त ईतर आवश्यक कागदपत्र तसेच अटी व शर्ती ७) मनपाने ज्या दिव्यांग व्यक्तींना व्यवसायासाठी कॅबीन उपलब्ध करून दिलेले आहेत त्यांना या योजनेचा लाभ घेता येणार नाही. ८) प्रत्येक वर्षी स्वतंत्र अर्ज सादर करणे आवश्यक आहे. ९) सदर योजनेचा लाभ ज्या दिव्यांग व्यक्तींचे वय ६० वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त असेल अश्या दिव्यांग व्यक्तींना या योजनेचा लाभ घेता येईल. १०) ज्या दिव्यांग व्यक्तींनी यापूर्वी व्यवसाय करणेकामी रु. ५०,०००/- अनुदानाचा लाभ घेतला आहे अश्या दिव्यांग व्यक्तींना या योजनेचा लाभ घेता येणार नाही. ११) दिव्यांग व्यक्तींस सदर योजनेचा लाभ आर्थिक वर्षात माहे एप्रिल ते माहे मार्चपर्यंतचा देण्यात येईल | | | |
| १० | कुष्ठरुग्णांना अनुदान देणे | प्रती लाभार्थी रक्कम रु. २०,०००/- | ०५ | रु.१,००,०००/- |
| | सदर योजनेकरीता तक्ताच्या वर नमूद केलेले १ ते ६ व्यतीरिक्त ईतर आवश्यक कागदपत्र तसेच अटी व शर्ती ७) कुष्टपिडीत व्यक्तींना सदर योजनेचा लाभ आर्थिक वर्षात माहे एप्रिल ते माहे मार्चपर्यंतचा देण्यात येईल. ८) प्रत्येक वर्षी स्वतंत्र अर्ज सादर करणे आवश्यक आहे. ९) ज्या कुष्ठरुग्ण व्यक्तींनी यापूर्वी व्यवसाय करणेकामी रु. ५०,०००/- अनुदानाचा लाभ घेतला आहे अश्या कुष्टरुग्ण व्यक्तींना या योजनेचा लाभ घेता येणार नाही. १०) कुष्ठपिडीत कारणास्तव किमान ४० टक्के व त्यापेक्षा जास्त कार्यात्मक/क्रियात्मक (Functional) असलेबाबत जिल्हा शल्य चिकीस्तक यांचे रुग्णालयाकडील प्रमाणपत्र. | | | |
| ११ | दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी आवश्यक शैक्षणीक साहीत्य /सहाय्यक उपकरणे खरेदीकामी अनुदान | प्रती लाभार्थी रु.२५,०००/- | ०६ | रु.१,५०,०००/- |
| | सदर योजनेकरीता तक्ताच्या वर नमूद केलेले १ ते ६ व्यतीरिक्त ईतर आवश्यक कागदपत्र तसेच अटी व शर्ती ७) यापूर्वी या योजनेचा लाभ घेतला असलेल्या दिव्यांग विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ पुन्हा घेता येणार नाही ८) मुख्याध्यापक किंवा प्राचार्य यांचे शाळा/महाविद्यालयात शिक्षण घेत असलेबाबतचे प्रमाणपत्र. ९)ज्या साहित्याची आवश्यकता आहे त्या साहित्याचे दरपत्रक/कोटेशन. | | | |
| १२ | दिव्यांग व्यक्तींस सहाय्यक उपकरणे खरेदी करणेकामी अनुदान देणे. | प्रती लाभार्थी रु.२५,०००/- | ०२ | रु.५०,०००/- |
| | सदर योजनेकरीता तक्ताच्या वर नमूद केलेले १ ते ६ व्यतीरिक्त ईतर आवश्यक कागदपत्र तसेच अटी व शर्ती ७) यापूर्वी या योजनेचा लाभ घेतला असलेल्या दिव्यांग व्यक्तींना या योजनेचा लाभ पुन्हा घेता येणार नाही ८) ज्या साहित्याची आवश्यकता आहे त्या साहित्याचे दरपत्रक/कोटेशन. | | | |

**भिवंडी महानगरपालिका कार्यक्षेत्रातील दिव्यांग व्यक्तींकरीता सामुदायीकरित्या राबविण्यात येणा-या योजना व करावयाची कामे**

| अ.क्र. | करावयाची कामे | लाभाचे स्वरुप | लाभार्थी संख्या | आवश्यक निधी |
|---|---|---|---|---|
| १ | महानगरपालिका शाळेत शिक्षण घेत असलेल्या दिव्यांग विद्यार्थ्यांकरीता थेरपी सेंटर निर्माण करुन त्याठिकाणी थेरपी साहित्य उपलब्ध करून देणे. **(सन २०२२-२३ मधील प्रस्तावीत काम)** | रु. ६,००,०००/- | **सामुदायीकरित्या** | रु.६,००,०००/- |
| २ | महानगरपालिका सार्वजनिक वाचनालयामध्ये दिव्यांग व्यक्तींकरीता ऑडिओ लायब्ररी निर्माण करणे **(सन २०२२-२३ मधील प्रस्तावीत काम)** | रु. १,०५,०००/- | **सामुदायीकरित्या** | रु. १,०५,०००/- |
| २ | दिव्यांग व्यक्तींकरीता टॉयलेटची व्यवस्था करणे | रु. ५,००,०००/- | **सामुदायीकरित्या** | रु.५,००,०००/- |
| ३ | महानगरपालिका कार्यालयात दिव्यांग दृष्टीहीन व्यक्तींसाठी Stainless Steel Braille Signage ची व्यवस्था करणेबाबत. | रु. २,००,०००/- | **सामुदायीकरित्या** | रु. २,००,०००/- |
| ४ | महानगरपालिका कार्यालयात दिव्यांग व्यक्तींसाठी चालण्यासाठी PU TACTILE TILE DIRECTIONAL व TACTILE TILE WARNING ची व्यवस्था करणेबाबत. | रु. २,००,०००/- | **सामुदायीकरित्या** | रु. २,००,०००/- |
| ५ | दिव्यांगाच्या विविध स्पर्धा आयोजित करणे | रु. १,००,०००/- | **सामुदायीकरित्या** | रु.१,००,०००/- |
| ७ | उपरोक्त व्यतिरिक्त तिथल्या स्थानिक परिस्थितीनुसार आवश्यक असलेल्या महात्वाकांशी योजना अमंलात आणणे | | | २९,०००/- |
| | **एकूण रक्कम** | | | रु.४८,३४,०००/- |

मला प्राप्त महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एमसीओ २०२०/प्र.क्र.७१(भाग-२) नवि.१४, दि.०६ जून, २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेष: कलम ४५२ अ च्या (१ अ) व ( १ ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजयकुमार म्हसाळ, प्रशासक, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, विभाग प्रमुख, समाज कल्याण विभाग, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, उपायुक्त, समाज कल्याण व अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार उपरोक्त योजनाकरिता प्रथम येणा-या अर्जदारास प्रथम प्राध्यान्य या तत्वावर सक्षम मान्यतेने लाभ देण्यात येतील. एका दिव्यांग व्यक्तीस वरीलपैकी कोणत्याही एकाच आर्थिक लाभाच्या योजनेचा लाभ घेता येईल. प्राप्त होणारे अर्ज स्विकारणे अथवा नाकारण्याचे संपुर्ण अधिकार प्रशासक तथा आयुक्त सो. यांना राहतील. तसेच या योजनांकरिता दरवर्षी दिव्यांग कल्याण करिता राखीव असलेली अर्थसंकल्पीय तरतूद विचारात घेऊन लाभार्थी संख्या निश्चित करण्यात येईल. यानुसार महानगरपालिका अर्थसंकल्पामध्ये दिव्यांग कल्याण विभागाकरिता राखीव असलेल्या निधीतून सदरच्या योजना व कामे करणेकामीच्या कामास उक्त शासन निर्देशानुसार व नमुद अटी-शर्तीस अधिन राहून प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

(विजयकुमार म्हसाळ)
प्रशासक
भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.
## पाणी पुरवठा विभाग

**विषय :- सन २०२१-२०२२ या वर्षाकरीताप्रभाग समिती क्र. १ ते ५ चे कार्यक्षेत्रात व्हॉल्वमन सेवा पुरविणेबाबतच्या कामास पहिली मुदवाढ मिळणेबाबत.**

सन २०२१-२०२२ या वर्षाकरीता प्रभाग समिती क्र. १ ते ५ चे कार्यक्षेत्रात व्हॉल्वमन सेवा पुरविणेबाबतच्या रु. १,६६,९५,८९०/- मात्रची ई निविदा जा.क्र./भिनिशमनपा/पापुवि/ १४२/२०२२ दिनांक ०४/०२/२०२२ रोजीचा कार्यादेश रोजीचा कार्यादेश मे बरकत कॉन्ट्रॅक्टर यांच्या यांचे नावे मंजूर झालेली आहे. सदर निविदेची मुदत दि. ३१/१२/२०२२ रोजी संपलेली आहे.

भिवडी नि. शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात पाच प्रभाग समिती आहेत. मनपाचे पाणी पुरवठा आस्थापनेवर व्हॉल्वमनची एकुण ५० पदे मंजुर असुन त्यापैकी ४९ पदे भरलेली आहेत. स्टेम प्राधिकरण यांचे कडुन ७३ द.ल.लि. व बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे कडून ३० द.ल.लि. प्रतिदिन व मनपाचे स्वतःचे स्त्रोत्रातुन २. लि. प्रतिदिन असा एकूण ११५ द.ल.लि. प्रतिदिन पाणी पुरवठा होत आहे.

भिवंडी शहरांत नवीन विकास क्षेत्रात वाढ होत असुन त्यामुळे लोकसंख्येत वाढ झालेली आहे. लोकसंख्येमुळे पाणी पुरवठ्याचे झोन वाढलेले आहेत. शहरांत एकूण ४१३ व्हॉल्व आहेत. २५ एम.एल.डी. योजने अंतर्गत शहरात बांधण्यात आलेल्या जलकुंभांपैकी एकुण ६ जलकुंभ कार्यान्वित करण्यात आलेले आहेत. शहरातील झोन निहाय व्हॉल्व उघडणे व बंद करणे करीता तीन पाळीमध्ये ८० ते ९० व्हॉल्वमनची आवश्यकता आहे. शहरातील पाणी पुरवठा वितरण करणे करीता आस्थापना विभागाकडुन व्हॉल्वमन कर्मचारी उपलब्ध झालेले नाहीत, त्यामुळे शहरांत वेळापत्रकानुसार व्हॉल्व उघडणे व बंद करणे करीता अडचण निर्माण होत असल्यामुळे सन्मा. नगरसेवक, पदाधिकारी तसेच नागरीकांच्या रोषास प्रशासनाला सामोरे जावे लागत आहे.

तसेच सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षा करीता व्हॉल्वमन सेवा पुरविणेबाबतच्या कामाची ई निविदा प्रसिध्द करण्यात आली असून पुढील कार्यवाही सूरू आहे. ई निविदा प्रक्रिया करून कार्यादेश देण्यास विलंब होणार आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | **सन २०२१-२०२२ या वर्षाकरीताप्रभाग समिती क्र. १ ते ५ चे कार्यक्षेत्रात व्हॉल्वमन सेवा पुरविणेबाबतच्या कामास पहिली मुदवाढ मिळणेबाबत. (दिनांक ०१/०१/२०२३ ते दिनांक ३१/०३/२०२३)** | **रु. ४५,४६,६१३/-** |

शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ रोजी नुसार मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा. प्रशासक यांना आहेत.

मनपा कार्यक्षेत्रात समिती क्र. १ ते ५ चे कार्यक्षेत्रात व्हॉल्वमन सेवा पुरविणेकामी सन २०२१-२०२२ च्या ई निविदेतील मंजूर दरानुसार मे बरकत कॉन्ट्रॅक्टर यांना दिनांक ०१/०१/२०२३ ते दिनांक ३१/०३/२०२३ रोजी पर्यंत ३ महिन्यांकरीता रु.४५,४६,६१३/- मात्रच्या पहिल्या मुदतवाढीचा प्रस्ताव.

**ठराव क्रमांक :** २०८ **दिनांक :** २१/०६/ **२०२३**

सन २०२१-२०२२ या वर्षाकरीताप्रभाग समिती क्र. १ ते ५ चे कार्यक्षेत्रात व्हॉल्वमन सेवा पुरविणेबाबतच्या कामास पहिली मुदवाढ मिळणेबाबतचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता व अति. आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजयकुमार म्हसाळ, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, पाणी पुरवठा विभागाकडील सन २०२१-२०२२ या वर्षाकरीता प्रभाग समिती क्र. १ ते ५ चे कार्यक्षेत्रात व्हॉल्वमन सेवा पुरविणेकामी सन २०२१-२०२२ च्या ई निविदेतील मंजूर दरानुसार मे बरकत कॉन्ट्रॅक्टर यांना दिनांक ०१/०१/२०२३ ते दिनांक ३१/०३/२०२३ रोजी पर्यंत ३ महिन्यांकरीता रु.४५,४६,६१३/- मात्रच्या पहिल्या मुदतवाढीस कार्योत्तर मंजुरी देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.शहरमहानगरपालिका,भिवंडी.**

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.
## पाणी पुरवठा विभाग

**विषय :- सन २०२१-२०२२ या वर्षाकरीताप्रभाग समिती क्र. १ ते ५ चे कार्यक्षेत्रात व्हॉल्वमन सेवा पुरविणेबाबतच्या कामास दुसरी मुदतवाढ मिळणेबाबत.**

सन २०२१-२०२२ या वर्षाकरीता प्रभाग समिती क्र. १ ते ५ चे कार्यक्षेत्रात व्हॉल्वमन सेवा पुरविणेबाबतच्या रु. १,६६,९५,८९०/- मात्रची ई निविदा जा.क्र./भिनिशमनपा/पापुवि/ १४२/२०२२ दिनांक ०४/०२/२०२२ रोजीचा कार्यादेश रोजीचा कार्यादेश मे बरकत कॉन्ट्रॅक्टर यांच्या यांचे नावे मंजूर झालेली आहे. सदर निविदेची मुदत दि. ३१/१२/२०२२ रोजी संपलेली आहे.

भिवडी नि. शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात पाच प्रभाग समिती आहेत. मनपाचे पाणी पुरवठा आस्थापनेवर व्हॉल्वमनची एकुण ५० पदे मंजुर असुन त्यापैकी ४९ पदे भरलेली आहेत. स्टेम प्राधिकरण यांचे कडुन ७३ द.ल.लि. व बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे कडून ३० द.ल.लि. प्रतिदिन व मनपाचे स्वतःचे स्त्रोत्रातुन २. लि. प्रतिदिन असा एकूण ११५ द.ल.लि. प्रतिदिन पाणी पुरवठा होत आहे.

भिवंडी शहरांत नवीन विकास क्षेत्रात वाढ होत असुन त्यामुळे लोकसंख्येत वाढ झालेली आहे. लोकसंख्येमुळे पाणी पुरवठ्याचे झोन वाढलेले आहेत. शहरांत एकूण ४१३ व्हॉल्व आहेत. २५ एम.एल.डी. योजने अंतर्गत शहरात बांधण्यात आलेल्या जलकुंभांपैकी एकुण ६ जलकुंभ कार्यान्वित करण्यात आलेले आहेत. शहरातील झोन निहाय व्हॉल्व उघडणे व बंद करणे करीता तीन पाळीमध्ये ८० ते ९० व्हॉल्वमनची आवश्यकता आहे. शहरातील पाणी पुरवठा वितरण करणे करीता आस्थापना विभागाकडुन व्हॉल्वमन कर्मचारी उपलब्ध झालेले नाहीत, त्यामुळे शहरांत वेळापत्रकानुसार व्हॉल्व उघडणे व बंद करणे करीता अडचण निर्माण होत असल्यामुळे सन्मा. नगरसेवक, पदाधिकारी तसेच नागरीकांच्या रोषास प्रशासनाला सामोरे जावे लागत आहे.

तसेच सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षा करीता व्हॉल्वमन सेवा पुरविणेबाबतच्या कामाची ई निविदा प्रसिध्द करण्यात आली असून प्राईजबिड उघडून निविदेतील दरांनामान्यता घेण्याची कार्यवाही सूरू आहे. ई निविदेतील दरांना मान्यता घेऊन कार्यादेश देण्यास विलंब होणार आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | **सन २०२१-२०२२ या वर्षाकरीताप्रभाग समिती क्र. १ ते ५ चे कार्यक्षेत्रात व्हॉल्वमन सेवा पुरविणेबाबतच्या कामास दुसरी मुदतवाढ मिळणेबाबत. (दिनांक ०१/०४/२०२३ ते दिनांक ३१/०५/२०२३)** | **रु. ३०,३१,०७५/-** |

शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ रोजी नुसार मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा. प्रशासक यांना आहेत.

मनपा कार्यक्षेत्रात समिती क्र. १ ते ५ चे कार्यक्षेत्रात व्हॉल्वमन सेवा पुरविणेकामी सन २०२१-२०२२ च्या ई निविदेतील मंजूर दरानुसार मे बरकत कॉन्ट्रॅक्टर यांना **दिनांक ०१/०४/२०२३ ते दिनांक ३१/०५/२०२३** रोजी पर्यंत दोन महिन्यांकरीता रु.३०,३१,०७५/- मात्रच्या दुस-या मुदतवाढीचा प्रस्ताव.

**ठराव क्रमांक :** २०८ **दिनांक :** २१ / ०६ / **२०२३**

सन २०२१-२०२२ या वर्षाकरीताप्रभाग समिती क्र. १ ते ५ चे कार्यक्षेत्रात व्हॉल्वमन सेवा पुरविणेबाबतच्या कामास पहिली मुदवाढ मिळणेबाबतचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता व अति. आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजयकुमार म्हसाळ, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, पाणी पुरवठा विभागाकडील सन २०२१-२०२२ या वर्षाकरीता प्रभाग समिती क्र. १ ते ५ चे कार्यक्षेत्रात व्हॉल्वमन सेवा पुरविणेकामी सन २०२१-२०२२ च्या ई निविदेतील मंजूर दरानुसार मे बरकत कॉन्ट्रॅक्टर यांना **दिनांक ०१/०४/२०२३ ते दिनांक ३१/०५/२०२३** रोजी पर्यंत दोन महिन्यांकरीता रु. ३०,३१,०७५/- मात्रच्या दुस-या मुदतवाढीस कार्योत्तर मंजुरी देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.शहरमहानगरपालिका,भिवंडी.**

## भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी
## बांधकाम विभाग

**प्रस्तावना:-**

**विषय :-** वार्ड क्र.१९ दुधबावडी रस्त्यावर गोल्डन हॉटेले जवळ काकुबाई चाळ येथे आर.सी.सी. पुल व सी.सी. रस्ता बनविणे.

भिवंडी नि.श.महानगरपालिका कार्यक्षेत्रात वार्ड क्र.१९ दुधबावडी रस्त्यावर गोल्डन हॉटेले जवळ काकुबाई चाळ येथे आर.सी.सी. पुल व सी.सी. रस्ता बनविणे. रु.१,०३,६५,१६२/- मात्रच्या प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे मा.आयुक्त महोदय यांनी त्यास मान्यता दिलेली आहे. शासन आदेश क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४ दि.०६ जुन २०२ रोजी नुसार मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचा कार्यभार प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार प्रसाकिय ठराव व निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा.प्रशासक सो. यांना आहेत.

ठराव क्र. 290

दिनांक :- २६/६/२०२३

भिवंडी नि.श.महानगरपालिका कार्यक्षेत्रात वार्ड क्र.१९ दुधबावडी रस्त्यावर गोल्डन हॉटेले जवळ काकुबाई चाळ येथे आर.सी.सी. पुल व सी.सी. रस्ता बनविणे. रु.१,०३,६५,१६२/- मात्रच्या प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२)नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजयकुमार म्हसाळ, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, वार्ड क्र.१९ दुधबावडी रस्त्यावर गोल्डन हॉटेले जवळ काकुबाई चाळ येथे आर.सी.सी. पुल व सी.सी. रस्ता बनविणे. रु.१,०३,६५,१६२/- मात्रच्या कामाच्या प्रस्तावास मा.प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी नि.श.महानगरपालिका

## भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी
## बांधकाम विभाग

**प्रस्तावना:-**

**विषय :-** वार्ड क्र.६ मध्ये सौदागर मोहल्ला, बंदर मोहल्ला व विविध ठिकाणी सी.सी. रोड बनविणे.

भिवंडी नि.श.महानगरपालिका कार्यक्षेत्रात वार्ड क्र.६ मध्ये सौदागर मोहल्ला, बंदर मोहल्ला व विविध ठिकाणी सी.सी. रोड बनविणे. रु.६९,९९,१११/- मात्रच्या प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे मा.आयुक्त महोदय यांनी त्यास मान्यता दिलेली आहे. शासन आदेश क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४ दि.०६ जुन २०२ रोजी नुसार मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचा कार्यभार प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार प्रसाकिय ठराव व निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा.प्रशासक सो. यांना आहेत.

ठराव क्र. 299

दिनांक :- 26/6 /२०२३

भिवंडी नि.श.महानगरपालिका कार्यक्षेत्रात वार्ड क्र.६ मध्ये सौदागर मोहल्ला, बंदर मोहल्ला व विविध ठिकाणी सी.सी. रोड बनविणे. रु.६९,९९,१११/- मात्रच्या प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२)नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजयकुमार म्हसाळ, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, वार्ड क्र.६ मध्ये सौदागर मोहल्ला, बंदर मोहल्ला व विविध ठिकाणी सी.सी. रोड बनविणे. रु.६९,९९,१११/- मात्रच्या कामाच्या प्रस्तावास मा.प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी नि.श.महानगरपालिका

**प्रस्तावना :-दि.२९/०६/२०२३ ते दि.१/०७/२०२३ या कालावधीत बकरी ईद सणा करिता विशेष स्वच्छता मोहिमे करिता मेहनताना तत्वावर मजुर घेणेकामी होणा-या खर्चास मा.प्रशासक तथा आयुक्त सो.यांची मान्यता मिळणे बाबत.**

बकरी ईद च्या अनुषगांने दि.८/०६/२०२३ रोजी झालेल्या युनियनच्या पदाधिकारी यांचे सोबत झालेल्या बैठकीत दि.२९/०६/२०२३ ते दि.१/०७/२०२३ या कालावधीत सफाई कामी मेहनताना तत्वावर मजुर घेणे विनंती केली असता मा.आयुक्त सो. यांनी निर्देश दिले होते.

मनपाच्या मार्केट विभागा मार्फत बकरी ईद सणाकरिता शहरातील विविध ठिकाणी मुस्लिम बांधवा मार्फत जनावरांची कुर्बानी दिले जाते.याकरिता प्रभाग समिती निहाय कुर्बानी दिलेल्या जनवारांची अपशिष्टांची उचलुन विल्हेवाट लावणेसाठी प्रभाग समिती निहाय विशेष पथक नियुक्त करण्यात येते सदर पथक हे जनावरांची अपशिष्टे उचलुन वाहनाद्वारे वाहतुक केली जाते. तद्‌नंतर ईदगाह स्लाटर हाऊस मागील बाजुस केलेल्या खड्ड्यात अपशिष्टांची विल्हेवाट लावली जाते. कुर्बानी दिलेल्या ठिकाणीच्या व इतर परिसरात नागरिकांचे आरोग्य अबाधित राखणेसाठी सदरची जागा पाणी टाकुन स्वच्छ पणे धुवुन जंतुनाशक व दुर्गधीनाशकांची प्रभावीपणे फवारणी करण्यात येते.

नियुक्त केलेल्या कर्मचारीना सदरचे काम दुर्गधीमय असल्याने त्यांना सुरक्षा साधन म्हणुन हॅन्डग्लोव्हज व मास्क उपलब्ध करुन दिले जाते तसेच नियुक्त कर्मचारी वर्गास खान-पान व्यवस्था केली जाते.सदर कामाचे गाभिर्यलक्षात घेते नियुक्त केलेले सफाई कर्मचारी यांनी सकाळी ७.०० ते काम संपेपर्यंत नियुक्त करण्यात येते जो पर्यंत स्वच्छता विषयकाचे काम पुर्ण होत नाही तो पर्यंत कर्मचारी वर्ग यांना कार्यमुक्त करण्यात येत नाही.सदरचे काम हे वर्ष निहाय करण्यात येत असुन कामाचे गाभिर्यलक्षात घेता आजतागायत पर्यंत भिवंडी शहरात कायदा सुव्यवस्था चोकपणे ठेवण्यात आले आहे.

यापुर्वी सन २०२२ या आर्थिक वर्षात बकरी ईद (जंतुनाशक,हार्डवेअर साहित्य व प्रभाग समिती निहाय कार्यरत सफाई कर्मचारी यांना अतिरिक्त भत्ता तीन दिवस) कालावधीत रु.३९,१०,२२०/- इतका खर्च आला होता.

सन २०२३-२४ कंत्राटी पध्दतीने/ठोक वेतनावर अर्धकुशल व अकुशल कामगारांना किमान वेतन कायद्यानुसार पाणीपुरवठा विभागाकडील मेहनताना मजुरांकरिता निश्चित दर प्रति दिन एका मजूर कामगार करिता रु.८६८.१३ असा असुन ३०१६ इतक्या मजुरासाठी रु.२६,१८,२८०/- इतका खर्च सर्वसाधारणपणे अपेक्षित आहे.

तरी या बकरी ईद कालावधीत सफाई कामी मेहनताना तत्वावर मजुर घेणेसाठी नियुक्त सक्षम संस्था नियुक्त करणेसाठी निविदा कार्यपद्धतीने प्रति दिन प्रति मजुराचे दर मागविणेचे असल्याने सदर संस्थेमार्फत नियुक्त मजुरांस सुरक्षा साधन,जंतुनाशक,खान-पान व्यवस्था,स्वच्छता विषयकाचे काम करणेसाठी हार्डवेअर साहित्य इत्यादी व्यवस्था नियुक्त संस्थे मार्फत होणे गरजेचे आहे.तसेच सदर कामाचे गाभिर्यलक्षात घेते व भिवंडी शहरातील कायदा व सुव्यवस्थेचे पालन करणे याची जबाबदारी संस्थेची राहिल या अटीवर दि.२९/०६/२०२३ ते दि.१/०७/२०२३ या धार्मिक सणा करिता विशेष स्वच्छता विषयक कामासाठी मेहनताना तत्वावर मजुर घेणेसाठी रु.२६,१८,२८०/- इतक्या खर्चास व कामाची निकड लक्षात घेता ७ दिवसाची निविदा प्रसिद्ध करणे अपेक्षित असल्याने सद्यास्थितीत महासभा अस्तित्वात मा.प्रशासक तथा आयुक्त सो.यांची मान्यता मिळवी ही विनंती.

दि.२६/०६/२०२३

**प्रशासकिय ठराव क्र.** 292

दि.२९/०६/२०२३ ते दि.१/०७/२०२३ या धार्मिक सणा करिता विशेष स्वच्छता विषयक कामासाठी प्रति दिन एका मजूर कामगार करिता रु.८६८.१३ असा असुन ३०१६ मेहनताना तत्वावर मजुर घेणेसाठी रु.२६,१८,२८०/- इतक्या खर्चास व कामाची निकड लक्षात घेता ७ दिवसाची निविदा प्रसिद्ध करणे अपेक्षित असल्याने सद्यास्थितीत महासभा अस्तित्वात मा.प्रशासक तथा आयुक्त सो.यांची मान्यता मिळणे कामी विभागाने शिफारस केली आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग२)/ नवि,दि.६/०६/२०२२ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५२ अ (१अ) व १ (ब) च्या तरतुदी नुसार मी विजयकुमार म्हसाळ प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, बकरी ईद (दि.२९/०६/२०२३ ते दि.१/०७/२०२३) च्या कालावधीत विशेष स्वच्छता विषयक कामासाठी (प्रति दिन एका मजूर कामगार करिता रु.८६८.१३पैसे) ३०१६ मेहनताना तत्वावर मजुर घेणेसाठी रु.२६,१८,२८०/- इतक्या खर्चास व कामाची निकड लक्षात घेता ७ दिवसाची निविदा प्रसिद्ध करणेस मंजुरी देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक तथा आयुक्त,**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**

**प्रस्तावना :- मान्सुन कालावधी व धार्मिक सणाकरिता जंतुनाशक व दुर्गधीनाशक उपलब्ध करुन देणे बाबत होण्या-या खर्चास मान्यता मिळणे बाबत.**

आरोग्य व स्वच्छता विभागासाठी सन २०२१-२०२२ व २०२२-२०२३ या अर्थिक वर्षासाठी ऑनलाईन ई-निविदे द्वारे प्राप्त झालेले निविदाकार यांनी सादर केलेल्या प्रति किलो व प्रति लिटरच्या दरानुसार सविंदा नुसार संबंधित पुरवठाधारक यांचे मार्फत उपलब्ध झाले आहे.सदर संविधा मध्ये मा.स्थायी समितीची कार्यादेश दिल्याच्या दिनांका पासुन पुढील २ वर्ष कालावधी (३१ जुलै २०२३ अखेर पर्यंत मुदत आहे.) अशी मान्यता नुसार पुरवठधारक यांनी नमुद परिमाणात विहित कालावधीत आरोग्य भांडारगृह येथे प्राप्त झाले आहे. याकामी सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षात रु.१,२७,०७,०००/- इतका व सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षात रु.२२,४३,२५०/- इतका खर्च आला होता.

तथापि भांडारपाल (आरोग्य) यांनी दिलेल्या अहवालानुसार बकरी ईद व पुढील महिन्यात येणारा मान्सुन कालावधी स्थानिक नागरिकांना मध्ये साथीचे आजार लागण होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने जंतुनाशक व दुर्गधीनाशकांची नितांत आवश्यकता भासते याकरिता मा.स्थायी समितीची कार्यादेश दिल्याच्या दिनांका पासुन पुढील २ वर्ष कालावधी असे म्हणजे ३१ जुलै २०२३ अखेर पर्यंत मुदत असल्याने तो पर्यंत नवीन निविदाची कार्यवाही त्यानंतर करावी लागणार आहे.

तरी पुढील कालावधीत येणारे धार्मिक सण व मान्सुन कालावधी पाहता व भांडारपाल आरोग्य यांनी सादर केलेल्या मागणी अहवाल व शिल्लकसाठ्या नुसार जंतुनाशक व दुर्गधीनाशक उपलब्ध होणे करिता मा.स्थायी समितीने मंजुर केलेल्या पुरवठाधारक व प्रति लिटर व किलोच्या दरानुसार खालील प्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

**मे.रमेश ॲग्रो केम कॉर्पोरेशन,भिवंडी**

| अ.क्र | जंतुनाशक व दुर्गधीनाशकांचे नाव | मंजुर दर | आवश्यक परिमाण | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | जर्मिटॉक्स पावडर | रु.७८/- | १०००० कि. | रु.७,८०,०००/- |
| २ | जर्मिनल विथ डी.सी.एम. एक्स इन एस. एस. इमल्शन लिक्वीड | रु.५१७/- | १००० लि. | रु.५,१७,०००/- |
| | | | | |
| | | | एकुण | रु.१२,९७,०००/- |

**मे.श्रीराम ॲग्रो ऐजन्सीज,मोर्शी,अमरावती**

| अ.क्र | जंतुनाशक व दुर्गधीनाशकांचे नाव | मंजुर दर | आवश्यक परिमाण | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | बायोट्रीट पावडर | रु.३९८/- | ३००० कि. | रु.११,९४,०००/- |
| २ | लिक्विड सोप | रु.२२०/- | १००० लि. | रु.२,२०,०००/- |
| | | | | |
| | | | एकुण | रु.१४,१४,०००/- |

**मे.एस.आर्.बी इन्डस्ट्रीज,सोलापुर**

| अ.क्र | जंतुनाशक व दुर्गधीनाशकांचे नाव | मंजुर दर | आवश्यक परिमाण | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | हर्बोडस्ट पावडर | रु.१३९/- | ४००० कि. | रु.५,५६,०००/- |
| २ | फिनोलिन सुपर पोर्ट | रु.२३४/- | १००० लि. | रु.२,३४,०००/- |
| | | | | |
| | | | एकुण | रु.७,९०,०००/- |

पुढील कालावधीत मान्सुन दाखल होवुन शहरात रोगराई पसरु नये यासाठी जंतुनाशकांची फवारणी करणेकरिता जंतुनाशकांची नितांत असल्याने आवश्यकता भासते याकरिता मा.स्थायी समिती ठराव क्र.२६४,दि.३०/०७/२०२१ ठरावानुसार गट निहाय नियुक्त पुरवठाधारक यांचेकडुन जंतुनाशक व

दुर्गधीनाशक उपलब्ध होणे करिता एकुण रु.३४,९९,०००/- इतका खर्च अपेक्षित सद्यास्थिती मा.महासभा अस्तित्वात नसल्याने मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळावी.

**प्रशासकिय ठराव क्र.** 293 **दि.**26/06 **/२०२३**

वार्षिक निविदे मधील जंतुनाशक व दुर्गधीनाशके उपलब्ध होणे करिता मा.स्थायी समिती ठराव क्र.२६४,दि.३०/०७/२०२१ अन्वयेच्या मंजुर प्रति लिटर व किलोच्या दराप्रमाणे संविदेच्या मंजुरी नुसार पुढील कालावधीत येणारे धार्मिक सण व मान्सुन कालावधी पाहता आवश्यक असलेले जंतुनाशक व दुर्गधीनाशक उपल्बध होणेकामी रु.३४,९९,०००/- इतक्या खर्चा खर्चास मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळणे कामी विभागाने शिफारस केली आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग२)/ नवि,दि.६/०६/२०२२ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५२ अ (१अ) व १ (ब) च्या तरतुदी नुसार मी विजयकुमार म्हसाळ प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,आरोग्य व स्वच्छता विभागासाठी आवश्यक असलेले जंतुनाशके,डासनाशके, अळीनाशके व दुर्गधीनाशके खरेदीच्या वार्षिक मंजुर निविदेमधील दराने जंतुनाशके,डासनाशके, अळीनाशके व दुर्गधीनाशके उपलब्ध होणे करिता मा.स्थायी समिती ठराव क्र.२६४,दि.३०/०७/२०२१ अन्वयेच्या मंजुरी नुसार प्रति लिटर व किलोच्या दरा प्रमाणे पुढील कालावधीत येणारे धार्मिक सण व मान्सुन कालावधी पाहता आवश्यक असलेले उपरोक्त जंतुनाशक व दुर्गधीनाशके उपल्बध होणेकामी मंजुर निविदाधारकाकडुन खरेदी करणेस व त्याकामी येणा-या रक्कम रु.३४,९९,०००/- इतक्या खर्चास मंजुरी देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**